# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता नववी : उत्तर चाचणी

**इयत्ता : नववी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................................................... **हजेरी क्र. :** ..................

**शाळेचे नाव :** ......................................................................................... **दिनांक :** ......................

## विभाग १ : गद्य

**प्र. १) खालील उतारा वाचाव त्यावर आधारित दिलेल्या कृती सोडव. (08.01.12)**

पुस्तकाकडे केवळ कागदावर छापलेला मजकूर इतक्या मर्यादित अर्थाने पाहता येणार नाही. पुस्तकांनाही जीव असतो. त्यांना स्वतःचं व्यक्तिमत्त्व असतं. पुस्तकं आपल्याशी बोलण्यासाठी उत्सुक असतात. गरज असते ती आपण त्यांच्याशी बोलण्याची, संवाद साधण्याची. एकदा का पुस्तकांशी मैत्री जुळली, नातं निर्माण झालं, की मग पुस्तकांकडून फक्त घेत राहायचं. परमेश्वराने आपल्याला एकच आयुष्य दिलं आहे पण या एकाच आयुष्यात अनेक आयुष्य जगण्याचा अनुभव आपल्याला केवळ पुस्तकच देऊ शकतात. शिवकथा वाचायला लागलो की, त्यांच्या शब्दांतून इतिहास जिवंत होतो. जंगलाबाबतचं वर्णन वाचताना घनदाट अरण्य, सृष्टीची मनोहरी रूप पहात पशुपक्षी, प्राण्यांशी संवाद साधतो. विनोदी कथेमुळे भन्नाट आणि गंमतीदार लोकांच्या विश्वात आपण हरवून जातो तर चरित्र वाचताना प्रतिकूल परिस्थिती आणि थोरा मोठ्यांचे कार्य आपल्याला अंतर्मुख बनवते. पुस्तक हे आयुष्याला संपन्न आणि श्रीमंत करणारं ज्ञानभंडार आहे. त्यातून मनोरंजन तर होतच आणि जाणिवाही प्रगल्भ होतात. शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्वे अन्नातून तर मन आणि बुद्धी यांच्या भरणपोषणासाठी आवश्यक सत्त्वे केवळ पुस्तकेच देतात. म्हणून पुस्तक प्रकाशवाटा दाखवणारा मित्र असतो. त्यांच्याशी नातं जोडायला हवं.

**अ) वरील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती कर.** **(२ गुण)**

१) आकृती पूर्ण कर.

पुस्तकांची वैशिष्ट्ये : | ............................... | ............................... |

२) पुस्तकांना लेखकाने दिलेली उपमा : ..................................................................

**आ) थोरा–मोठ्यांची चरित्रे आणि विनोदी कथा वाचताना तुझ्या मनावर होणारे परिणाम. (२ गुण)**

१) ..........................................................................................................

२) ..........................................................................................................

इ) **स्वमत कृती** (२ गुण)

१) पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे तुझ्या शब्दांमध्ये लिही.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

## विभाग २ : पद्य

**प्र. २) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती कर. (08.01.10)**

*गोमू माहेरला जाते हो नाखवा ।*
*तिच्या घोवाला कोकण दाखवा ।।*
*दावा कोकणची निळी निळी खाडी ।*
*दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी ।*
*भगवा अबोली फुलांचा ताटवा ।।१।।*
*कोकणची माणसं साधी भोळी ।*
*काळजात त्यांच्या भरली शहाळी ।*
*उंची माडांची जवळून मापवा ।।२।।*
*सोडून दे रे खोड्या साऱ्या ।*
*शिडात शीर रे अवघळ वाऱ्या ।*
*झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।*



**अ) खालील आकृतिबंध पूर्ण कर.** **(२ गुण)**

..........................

.......................... ← कोकणची वैशिष्ट्ये → ..........................

..........................

**आ) खालील चौकटी पूर्ण कर.** **(२ गुण)**

१) गोमूचे माहेर : ..........................

२) कोकणची माणसं : ..........................

**इ) खालील ओळींचा तुला समजलेला अर्थ लिही.** **(२ गुण)**

१) झणी धरणीला गलबत टेकवा : ..........................................................................

..........................................................................................

२) काळजात त्यांच्या भरली शहाळी : ..........................................................................

..........................................................................................

**ई) कवीने वाऱ्याला केलेल्या विनंतीचा अर्थ तुझ्या शब्दात पूर्ण कर.** **(२ गुण)**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## विभाग ३ : भाषाभ्यास

**प्र. ३) अ) खालील ओळींचे गण पाड. (08.01.18)** **(१ गुण)**

१) फेकी रसाल तरुही मधुगंधपाश.

..........................................................................................

..........................................................................................

**आ) खालील शब्दांचे सामान्यरूप लिही.** **(१ गुण)**

१) लेखकाच्या : ........................ २) सवर्यींना : ...........................

**इ) खालील शब्दांमधील अशुद्ध शब्द ओळखून शुद्ध करून लिही.** **(२ गुण)**

प्रसिद्‌ध, सहानूभुती, वैश्विक, सांस्कृतीक, तिर्थरूप, सर्वांगीण, हार्दिक, मैत्रिण, विश्वकोष, भाषातज्ञ, मूहुर्त

..........................................................................................

..........................................................................................

**ई) खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिही.** **(१ गुण)**

१) अबब केवढा मोठा हा साप

..........................................................................................

**ड) खालील शब्द अकारविल्हेनुसार क्रमाने लाव.** **(१ गुण)**

अर्णव, मनोहारी, अजय, सरिता, कागद, पतंग, उपवन, विश्वास, नयन, आकाश.

..........................................................................................

..........................................................................................

## विभाग ४ : उपयोजित लेखन

**प्र. ४) अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडव. (शब्दमर्यादा प्रकारानुसार ६० ते ९० शब्द) (५ गुण)**

१) स्पर्धा परीक्षेची पुस्तके विक्री करणाऱ्या दुकानाची जाहिरात तयार करा. **किंवा**

२) तुमच्या शाळेत साजऱ्या झालेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची बातमी तयार करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**आ) झाडे लावा, देश वाचवा ! खालील मुद्द्यांच्या आधारे तुझे विचार लिही. (५ गुण)**

१) झाडांचे महत्त्व
२) पिढ्यानपिढ्या होत असलेली चूक
३) उजाड देश
४) पाऊस कमी
५) भूगर्भातील पाण्याची पातळी खाली
६) पर्यावरणाचा तोल हरवला
७) विविध कारणांनी झाडे लावायची, जोपासायची, वाढवायची

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................